**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ

अकोला

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 24-03-2023**

**बुलढाणा(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-03-24 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-03-25 | 2023-03-26 | 2023-03-27 | 2023-03-28 | 2023-03-29 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 3.8 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 32.6 | 32.0 | 32.3 | 33.0 | 33.6 |
| किमान तापमान (अं.से) | 19.5 | 20.3 | 19.9 | 19.2 | 19.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 48 | 59 | 58 | 55 | 51 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 39 | 37 | 33 | 31 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6.0 | 7.0 | 5.0 | 5.0 | 5.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 316 | 315 | 306 | 316 | 306 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 6 | 3 | 4 | 3 |

## हवामान सारांश / चेतावणी:

भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात दि.२४,२६,२७ आणि २८ मार्च रोजी जिल्ह्यात कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. तसेच दि. २५ मार्च रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या अवकाळी पावसाची व मेघगर्जनेसह विजांचा गडगडाट होण्याची, वादळी वाऱ्याची (३०-४० किमी/तास) शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

हलक्या अवकाळी पावसाची शक्यता लक्षात घेता, शेतकऱ्यांनी गहु व हरभरा पिकांची कापणी केलेली असल्यास शेतमाल ताबडतोब सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. साठवणुकीची व्यवस्था नसल्यास संबंधित शेतमाल प्लास्टिक शीटने/ ताडपत्रीने झाकून ठेवावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

सध्याची हवामान परिस्थिती लक्षात घेऊन कापणी केलेल्या धान्याला २ ते ३ दिवस उन्हात वाळवावे.धान्यातील दाण्यात १०% पेक्षा जास्त ओलावा राहू नये याची साठवणुकीच्या वेळी काळजी घ्यावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | उन्हाळी भुईमुंगावर पाने पोखरणारी अळी किंवा तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसताच लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% @ ४ मिली/१० ली. पाणी किंवा क्विनॉल्फॉस २५% @२८ मिली/१० ली. पाणी याप्रमाणात फवारणी करावी. पिकाला आऱ्या अवस्थेमध्ये मातीची भर द्यावी जेणेकरून शेंगांची वाढ चांगली होण्यास मदत होईल. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सूर्यफूल | सुर्यफुल पिकामध्ये तुडतुडे/फुलकिडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रिड १७.८ % कीटकनाशकाची २.० मिली/ १० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वेळेवर पेरणी केलेल्या गव्हाचे पिक परिपक्व झाले असल्यास त्याची कापणी करून मळणी करावी. मळणी करताना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.मळणी केल्यानंतर तयार झालेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कागदी लिंबू | लिंबूच्या झाडांवर होणाऱ्या डिंक्या रोगाच्या नियंत्रणासाठी लिंबू झाडाच्या बुंध्याला १ मीटरपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी. |
| वांगे | वांगीवरील तुडतुडे, मावा व पांढरीमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी फॉस्पेमीडॉन ४० % एस.एल. १५मिली किंवा फेनप्रोपॅथ्रीन ३० % ई.सी. ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | मिरची पिकावरील शेंडेमर व फळसड रोगाच्या नियंत्रणाकरिता डायफेनकोनॅझॉल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किंवा अॅझोक्झायस्ट्रोबिन २३ ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी वाऱ्याच्या दिशेने करावी. |
| पेरू | पेरू बागेतील फळ असलेल्या मोठ्या झाडांना त्यांचे वय,जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन योग्य वेळी अचूक प्रमाणात ओलीत करावे व शिफारसीत खतांच्या मात्रा द्याव्यात. |
| संत्रा | आंबिया बहारामध्ये नवीन पालवी येण्याच्या वेळेस सीट्रस सिल्ला या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडीच्या प्रादुर्भावामुळे फळझाडांवर विषाणूजन्य रोगाचा प्रसार होऊ शकतो. म्हणून सीट्रस सिल्लाच्या व्यवस्थापनासाठी ईमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. |
| कांदा | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे कांद्यावर फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. म्हणून तिच्या नियंत्रणासाठी लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. फवारणी करताना चिकट द्रव्याचा (०.१%) वापर करावा. |
| टरबूज | परिपक्व झालेली टरबूजाची फळे तोडून घेऊन सावलीत ठेवावी व त्यातली किडग्रस्त ,सडकी फळे वेगळी काढून चांगली फळे बाजारपेठेत नेण्याची व्यवस्था करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | मेघगर्जनेसह विजांचा गडगडाट होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी आपापली जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावीत.जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था गोठ्यातच करावी. |